**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील :-**

**१.१** राज्य शासनाच्या जलसंपदा विभाग तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील सहायक अभियंता (यांत्रिकी) गट-ब पदावरील भरतीकरिता सदर परीक्षा एकत्रितरित्या घेण्यात येते .

**१.२ पदांचा तपशील :-**

**(१) संवर्ग :** राजपत्रित, गट - ब.

**(२) नियुक्तीचे ठिकाण :** महाराष्ट्रात कोठेही.

**(३) वेतनबँड व ग्रेड वेतन –**

(एक) **सहायक अभियंता, गट-ब (यांत्रिकी) - रुपये** ९३००-३४८००-४४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

**(४) उच्च पदावर बढतीची संधी**-ज्येष्ठता व पात्रतेनुसार अभियांत्रिकी सेवेतील उच्च कार्यकारी व प्रशासकीय पदावर.

**१.३** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात/ अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतो.

**२. परीक्षेचे टप्पे :-**

**२.१** दोन. (१) लेखी परीक्षा - ४०० गुण. (२) मुलाखत - ५० गुण

**२.२** मुख्य परीक्षेकरीता आयोगाने विहित केलेले किमान किंवा अधिक गुण मिळविणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतील.

**२.३** जाहिरातीतील तरतुदीनुसार विहित अटींची पूर्तता करणा-या व मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ कागदपत्रे सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते.

**३. अर्हता :-**

**३.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची यंत्र अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने त्या पदवीशी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता.

**३.२** शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक डीसीएस-१०८९/२१४८/का.सेवा-३, दि.२५ एप्रिल, १९९० नुसार खालील अर्हता पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-

(१) बी.ई (ॲटोमोबाईल )

(२) बी.ई (इंडस्ट्रिअल)

(३) बी.ई (प्रॉडक्शन)

**३.३** मराठीचे ज्ञान आवश्यक.

**४ शुल्क (फी) :-**

**४.१ परीक्षा शुल्क** :- (१ )अमागासवर्गीय रुपये ५१५ /- (२) मागासवर्गीय रुपये ३१५/-

**४.२** वि.जा.(अ),भ.ज.(ब),वि.मा.प्र.,भ.ज.(क),भ.ज.(ड) व इ.मा.व. प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रीमी लेअर) मोडणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**४.३** उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रीमी लेअर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**४.४** दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च, १९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर करुन भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून, १९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रतावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**५. परीक्षा योजना :-**

**५.१ प्रश्नपत्रिका :- दोन.** प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| पेपर क्र. | विषय | संकेतांक | प्रश्नसंख्या | गुण | माध्यम | कालावधी | दर्जा | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | ०१४ | १०० | १०० | मराठी | एक तास | १२ वी | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | | | | इंग्रजी | | पदवी | |
| | सामान्य अध्ययन | | | | मराठी व इंग्रजी | | | |
| २ | यंत्र अभियांत्रिकी | ९६४ | १५० | ३०० | इंग्रजी | अडीच तास | बी.ई. (यांत्रिकी) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**५.२ अभ्यासक्रम : सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**५.३ परीक्षा केंद्र :-**

**५.३.१** खालील चार ठिकाणी परीक्षा घेण्यात येते :-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| नागपूर | **३२** |
| पुणे | **३८** |

**५.३.२** विहित पद्धतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवाराने केलेल्या मागणीनुसार व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**५.३.३** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**५.३.४** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**५.३.५** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शक ले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**५.३.६** एकदा निवडलेल्या केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**६. लेखी परीक्षेचा निकाल :-**

**६.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.२** भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी ३ पट उमेदवार मुलाखतीसाठी उपलब्ध होतील, अशा रीतीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

**६.३** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मुलाखतीसाठी पात्र समजण्यात येईल.

**६.४** प्रस्तुत लेखी परीक्षेमधून मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त होण्याकरिता शतमत **(Percentile)** पध्दत लागू आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवाराच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र असतील:-

(१) अमागास- किमान ३५ शतमत

(२) मागासवर्गीय- किमान ३० शतमत

(३) विकलांग- किमान २० शतमत

(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू- किमान २० शतमत

**६.५** विकलांग अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू या प्रवर्गाच्या किमान सीमा रेषेच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा- या उमेदवारास दोन्हीपैकी एकच सवलत घेता येईल.

**६.६** लेखी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल.तसेच, मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ईमेलद्वारे व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

**६.७** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच अपंग, महिला व पात्र खेळाडू उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**७. पदांचा पसंतीक्रम :-**

**७.१** लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या व जाहिरात / अधिसूचनेत विहित केलेल्या अर्हता, अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांना संबंधित परीक्षेमधून भरावयाचा पदांचा पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने देणे आवश्यक राहील.

**७.२** पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी उमेदवारांस खालील अटींवर देण्यात येईल :-

**(१)** पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

**(२)** पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पदाच्या पसंतीक्रमात बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

**(३)** आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने पसंतीक्रम सादर न केल्यास अधिसूचनेत नमूद केलेल्या पदक्रमांकानुसारच त्यांचा पसंतीक्रम आहे, असे समजण्यात येईल व त्यात नंतर बदल करण्याची संधी देण्यात येणार नाही.

**८. मुलाखत :-**

**८.१** वरील परिच्छेद क्रमांक ६ नुसार पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. मुलाखत ५० गुणांची असेल.

**८.२** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

**८.३** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**८.४** मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस घेण्यात येतील.

**९. अंतिम निकाल :-**

मुख्य परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमध्ये समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) `` **उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**`` मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

**१०. शिफारस :-**

**१०.१ "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये** नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

**१०.२ मुलाखत** घेतलेल्या उमेदवारांना मुलाखतीनंतर शक्य तितक्या लवकर, त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही ते, ईमेलद्वारे कळविण्यात येईल. तसेच, शिफारस झालेल्या उमेदवारांची नांवे आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील.

*****************